# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वाी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


क्र.विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१८ ३३९ दि. १६/२/१८

**अत्यंत महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य
सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित व विना अनुदानित महाविदयालये,
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

**विषयः सन २०१८-१९ साठी National Scholorship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी नविन महाविद्यालयांच्या नाव नोंदणीबाबत.**

संदर्भः मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिस/ शिष्य/ २०१८/ १८८६, दि. १५.०२.२०१८

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ च्या अंमलबजावणीसाठी ज्या महाविद्यालय/संस्थेचे नाव NSP Portal (www.scholarships.gov.in) च्या होम पेज वरील Search Institute/School/ITI या लिंक वर गेल्यानंतर दिसत नसेल अशा महाविद्यालयांनी त्यांचे महाविद्यालय/संस्थेची नाव नोंदणी दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत करणे आवश्यक आहे.

दिनांक ३१.०३.२०१८ नंतर सदर पोर्टलवरील नविन नाव नोंदणीची प्रक्रिया बंद होणार असून विहित मुदतीनंतर नाव नोंदणीसाठी महाविद्यालयांची माहिती प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. सदर पोटर्लवर ज्या महाविद्यालयांचे नाव दिसत नाही अशा महाविद्यालयांनी नाव नोंदविणेसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरील स्कॉलरशिप विभागातील केंद्रपुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांच्या लिंकवरील नविन महाविद्यालय/संस्था यांच्या नाव नोंदणीसाठी दिलेल्या विहित नमुन्यातील (Format For New Institute/ College Registration) विवरणपत्रातील माहिती भरून आवश्यक कागदपत्रांसह scholarshippms@gmail.com या ई-मेलवर दि.३१.०३.२०१८ पर्यत कार्यालयीन वेळेत पाठविणे आवश्यक आहे. तसेच महाविद्यालय/संस्था यांना नाव नोंदणीसाठी येणाऱ्या अडचणीबाबत मा. संचालनालयाच्या ०२०-२६१२६९३९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सोबतः संदर्भिय पत्र

RBhosle
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत :
मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ यांना माहितीस्तव सादर